## भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ अनुसार

**साक्षीदार** – विशाल उमाकांत कांबळे,
वय :– २७ वर्षे, व्यवसाय :– व्यापार,
राहणार :– गणेश नगर, औसा, ता. औसा, जि. लातूर.

**मी शपथपुर्वक निवेदन करते की** :

**०१.** आरोपी शिवाजी बिराजदार, विष्णु बिराजदार, अविनाश सुर्यवंशी, अर्चना सुर्यवंशी आणि गोजरबाई बिराजदार यांना मी ओळखतो. सदर आरोपींनी मला दर महिना पाचशे रुपये भरुन गट चालु करायला सांगितले होते. त्यानुसार मी दर महिन्याला पाचशे रुपये भरण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की, जेव्हा पैशांची गरज असेल तेव्हा दोन टक्के व्याजाने पैसे घेवु शकतात. त्यानुसार मी लागेल तेव्हा पैसे घेत राहीलो आणि नंतर भरत राहीलो.

**०२.** सन २०१७ तसेच सन २०२० मध्ये मी सदर गटातुन पैसे घेतले. त्यानुसार नंतर ते पैसे भरले. त्यानंतर पुन्हा मी पैसे मागण्यासाठी गेलो असता आरोपींनी सांगितले की, 'गटाचे चेक संपले आहेत, तुमचे दोन चेक द्या, पैसे देतो'. त्यानुसार मी माझ्या आईच्या नावे रेखा उमाकांत कांबळे यांचे दोन चेक आय.सी.आय.सी.आय. बँक, शाखा औसा चे चेक क्र.५४३ तसेच चेक क्र.५४७ चे चेक आरोपींना दिले. त्यानंतर मी आरोपींकडे पैशांचा हिशोब मागितला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देवुन 'तुम्हाला कशासाठी हिशोब द्यायचा' असे म्हणाले.

**०३.** सदर आरोपी हे त्यांचेकडे रजिष्टरमध्ये गटाचा हिशोब लिहीत असत. सदर गटामध्ये ७२ लोक समाविष्ट होते. आरोपींनी सदर गटाबाबत आम्हाला पासबुक दिले होते. त्या पासबुकावर आरोपी हे खाडाखोड करीत होते. त्यावर मी त्यांना सांगितले की, माझे चेक परत द्या आणि माझा हिशोब

पुर्ण करा. त्यावर आरोपी म्हणाले की, ‘तुम्ही कोण विचारणारे.’ त्यानंतर मी आमच्या गल्लीतील बायका घेवुन आरोपींकडे गेलो. परंतु आरोपींनी हिशोब दिला नाही. मी भरलेल्या पाचशे रुपये रक्कमेचा आरोपींनी इतरांना व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय केला. साधारण सन २०१७ ते सन २०२४ पर्यंत मी पैसे भरले होते.

**०४.** सदर प्रकाराबाबत मी औसा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली परंतु पोलीसांनी त्यानुसार फिर्याद नोंद केली नाही. त्यानंतर पोलीस अधिक्षक, लातूर यांच्याकडे तक्रार नोंद केली. आरोपीवर योग्य कारवाई शिक्षा व्हावी ही विनंती.

समक्ष

साक्षीदाराची सही/अंगठा व तारीख.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.04.09 17:24:32 +0530

(श्री. आवटे पी. पी.)

दिनांक ०९/०४/२०२६. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, औसा.